

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र


वर्ष ४८ वे

अंक ७ वा

१० जुलै २०२६

किंमत १ रुपया


पंढरीची वारी जयाचिये कुळी ।
त्याची पायधुळी लागो मज ।।

- संत नामदेव महाराज



## आषाढी एकादशी

दि.२५ जुलै





## गुरुपौर्णिमा

विद्वत्त्वं दक्षता शीलं संक्रान्तिरनुशीलनम्।
शिक्षकस्य गुणाः सप्त सचेतस्त्वं प्रसन्नता।।

दि.२९ जुलै

निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा !



संस्थेचे विश्वस्त प्रा. दिलीप फडके यांना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा यश जीवन गौरव पुरस्कार





जागतिक योग दिन उत्साहात साजरा









स्नेहबंधच्या कार्यक्रमात डॉ. निकिता पाठक यांचे फिजिओथेरपी वर मार्गदर्शन

# संस्थेचे विश्वस्त प्रा. दिलीप फडके यांना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा यश जीवन गौरव पुरस्कार



**प्रा. दिलीप फडके (सर)**

संस्थेचे विश्वस्त, नाशिक एज्युकेशन सोसायटीचे तसेच सार्वजनिक वाचनालय नाशिकचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके (सर) यांना साहित्य, संस्कृती व ग्राहक संरक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदाना – बद्दल यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या वतीने यश जीवन गौरव पुरस्काराने दि. १ जुलै २०२६ रोजी सन्मानित करण्यात आले. सेवानिवृत्त एअर मार्शल श्री. भूषण गोखले यांच्या हस्ते व विद्यापीठ कुलगुरू डॉ.संजीव सोनवणे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

संपूर्ण महाराष्ट्रातून विविध क्षेत्रातील एकूण पाच मान्यवर व्यक्तींना या कार्यक्रमात गौरविण्यात आले त्यात नाशिक जिल्ह्यातून फडके सर यांची निवड करण्यात आली. फडके सरांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !

# जागतिक योग दिन उत्साहात साजरा

संस्थेने यावर्षी जागतिक योग दिनानिमित्त श्री परशुराम भवन येथे योग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे योग प्रशिक्षक प्रदीपजी मोडक यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळी ६.३० वाजता ओमकार, महामृत्युंजय, दुर्गा उपासनेच्या मंत्र आणि प्रार्थनेने, श्रध्दा, भक्ती व निष्ठेने कार्यक्रमास प्रारंभ झाला. उद्देश होता विवेक, एकाग्रता, स्वास्थ वाढीसाठी व आपल्या अंतर मनात डोकावण्यासाठी.

ताडासन, तिर्यक ताडासन, कटीचक्रासन अश्या वाढत्या वयात अत्यंत उपयोगी ठरणाऱ्या विविध योगासने व ती करावयाची योग्य पद्धत आणि त्यांचे शरीरावर होणारे सकारात्मक परिणाम याविषयी मोडक सरांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अंतर्मुख करणारे शवासन व तद्नंतर केलेला प्राणायामाचा अभ्यास यामुळे उपस्थितांना नवचैतन्य व उत्साहाची अनुभूती मिळाली.

सकाळी सुमारे ८.४५ वाजता रामप्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली. या प्रसंगी संस्थेचे विश्वस्त श्री. केळकर, अध्यक्ष विजय साने, कार्यकारी मंडळातील सदस्य तसेच बहुसंख्येने उपस्थित असलेले सभासद, बंधू–भगिनी यांचा उत्स्फूर्त सहभाग विशेष उल्लेखनीय ठरला.

कार्यक्रमामुळे योगाचे महत्त्व, नियमित साधनेची आवश्यकता आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश सर्वांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला.

**हेमंत वाड – कार्यकारिणी सदस्य**

# उद्योजक मंचाची जून मधील सभा उत्साहात संपन्न

NASCUM मित्रांची १६ जून २०२६ ची संध्याकाळची सभा नेहमीप्रमाणेच खूप संस्मरणीय होती.

पहिल्या सत्रामध्ये, सभासदांनी आपापली ओळख करून दिल्यानंतर, श्री. देवेंद्र बापट सर यांनी, आपल्या सभा अधिक रोचक बनवण्यासाठी काय बदल करावेत, याविषयी सूचना देण्याची सभासदांना विनंती केली. त्यातील एक विनंती अशी होती की, सभासदांनी, पुढे येऊन आपला व्यवसाय करत असताना कोणत्या अडचणी आल्या आणि त्यांच्यावर मात कशी काय करता आली याविषयी अनुभव सांगितले तर त्या अनुभवांचा इतर सर्व सभासदांना फायदा होईल. दुसऱ्या सत्रामध्ये प्रमुख वक्ते, श्री. शिवाजी जोशी, यांनी आपला व्यवसाय करत असताना जास्त ग्राहक कसे मिळवावेत याविषयी मार्गदर्शन केले. श्री. शिवाजी जोशी यांना जाहिरात क्षेत्रात काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे. अनेकदा आपण आपल्या ग्राहकांचे लक्ष वेधून घेतो, परंतु त्यानंतर त्या संधीचे 'प्रत्यक्ष विक्री व्यवहारात' रूपांतर होत नाही. हे टाळण्यासाठी काय करायला हवे, हा त्यांच्या मार्गदर्शनाचा मुख्य उद्देश होता. हा कठीण असणारा विषय श्री. शिवाजी जोशी यांनी व्यवहारातील उदाहरणे देऊन खूप सोपा करून सांगितला. काही मित्र सभेला हजर राहू शकले नाहीत, त्याची चुटपुट वाटली. आपला कार्यक्रम संपन्न होण्यासाठी पडद्यामागे काम करणारे 'चित्तपावन ब्राह्मण संघ', परशुराम भवन येथील कर्मचारी, तसेच सर्व संयोजक यांचे मनापासून आभार.

**– आर्क. दीप भागवत**

## श्री. अनिल जोगळेकर यांचे १००१ श्री गणेश रुपांचे चित्र प्रदर्शन

आपल्या संस्थेचे आजीव सदस्य श्री. अनिल त्र्यंबक जोगळेकर यांनी नुकतेच त्यांनी रेखाटन केलेल्या १००१ गणेशाच्या विविध चित्रांचे प्रदर्शन इंदिरानगर मधील सर्वात्मक वाचनालय येथे दि. २२ ते २४ मे २०२६ या कालावधीत भरवले होते.

संस्थेच्या कार्यकारी मंडळा प्रमाणेच इतरही अनेक नामांकित व्यक्तींनी त्यास भेट दिली. जोगळेकर हे मायको बॉश कंपनीमध्ये डिझाईन इंजिनियर म्हणून कार्यरत होते. चित्रकलेची आवड जोपासण्याचे छंदातून गणपती काढायला लागले. पुढे प्रिंटींग व्यवसायात पत्रिकेसाठी अजून संख्या वाढली. २०१८ पासून त्यांना पार्किनसन्सच्या त्रासाची सुरूवात झाली.

काही काम करताना त्यांचे हात खूप थरथरायला लागायचे मात्र गणपती काढायला घेतला की हात एकदम स्थिर. मग त्यांनी चक्क १००१ गणपती काढण्याचा संकल्प केला आणि तो पूर्ण देखील केला. त्याच्या या चिकाटीबद्दल संस्थेतर्फे त्यांचे मनःपुर्वक अभिनंदन. आपल्या नविन वास्तूत एकदा प्रदर्शन लावण्याचा त्यांचा मानस आहे.

## श्री परशुराम भवनास सेवा निवृत्त एअर चीफ मार्शल श्री. भूषण गोखले यांची सदिच्छा भेट

भारतीय वायुसेनेतून निवृत्त झालेले एअर चीफ मार्शल श्री. भूषण गोखले (परम विशिष्ट सेवा पदक, अति विशिष्ट सेवा पदक व वायुसेना पदक यांनी सन्मानित) यांनी सपत्नीक श्री परशुराम भवनास सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी संस्थेच्या नव्याने उभारलेल्या वास्तूची पाहणी केली. संस्थेमार्फत समाजहितासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, सेवा योजना व भावी संकल्प यांची त्यांनी आस्थेने माहिती करून घेतली. संस्थेच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत त्यांनी समाजाभिमुख कार्याबद्दल गौरवोद्गार व्यक्त करून संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी विश्वस्त श्री. प्रभाकर केळकर, श्री. देवेंद्र बापट तसेच अध्यक्ष श्री. विजय साने यांनी एअर चीफ मार्शल श्री. बी. एन. गोखले यांचा शाल व श्री परशुरामांची प्रतिमा देऊन सन्मानपूर्वक सत्कार केला. प्रसंगी कार्यकारिणी सदस्य तसेच डॉ. करंदीकर उपस्थित होते.

## – डॉक्टरांच्या क्लिनिक मध्ये उमटले सप्तस्वर –
## प्रसिद्ध गायक पंडित आशिष रानडे यांचा आगळावेगळा उपक्रम

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून अहोरात्र झटणाऱ्या डॉक्टरांचे वेळापत्रक अत्यंत व्यग्र आणि तणावाचे असते. अनेकदा आपत्कालीन परिस्थिती (इमर्जन्सी) किंवा रुग्णांची काळजी यामुळे सायंकाळच्या वेळी होणाऱ्या शास्त्रीय संगीताच्या मैफिलींना उपस्थित राहणे या डॉक्टरांना शक्य होत नाही. हीच गोष्ट लक्षात घेऊन, नाशिकमधील प्रसिद्ध 'सूरकल्प फाउंडेशन'तर्फे 'जागतिक डॉक्टर्स डे' (World Doctor's Day) निमित्त एक अत्यंत आगळावेगळा आणि कौतुकास्पद उपक्रम राबवण्यात आला.

फाउंडेशनचे संस्थापक आणि शास्त्रीय गायक डॉ. आशिष रानडे यांनी स्वतः नाशिकमधील ८ ते १० नामवंत डॉक्टरांची प्रत्यक्ष भेट घेतली. केवळ नेहमीच्या पद्धतीने पुष्पगुच्छ किंवा शुभेच्छा न देता, डॉक्टरांच्या क्लिनिक आणि हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यांना थेट संगीताच्या सुरावलींमधून 'स्वर–शुभेच्छा' देण्यात आल्या. या अनोख्या सांगीतिक भेटीने डॉक्टर कमालीचे भारावून गेले होते. तणावमुक्तीसाठी संगीताची साथ. सततच्या धावपळीतून डॉक्टरांना काही काळ निवांतपणा मिळावा, संगीताच्या माध्यमातून त्यांना मानसिक दिलासा मिळावा आणि संस्थेचा सामाजिक सुसंवाद वाढावा, हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश होता. क्लिनिकच्या वातावरणात अचानक घुमलेल्या शास्त्रीय संगीताच्या स्वरांनी काही क्षणांसाठी का होईना, डॉक्टरांचा थकवा दूर केला.

''डॉक्टर नेहमीच समाजाची काळजी घेत असतात, पण त्यांच्या व्यग्रतेमुळे त्यांना सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेता येत नाही. म्हणूनच 'सूरकल्प फाउंडेशन'ने स्वतः डॉक्टरांच्या दारात जाऊन ही सांगीतिक भेट दिली. संगीताने त्यांच्या चेहऱ्यावर आणलेला आनंद आमच्यासाठी खूप मोलाचा आहे.''असे डॉ. आशिष रानडे यांनी सांगितले.

या उपक्रमात नाशिकमधील विविध क्षेत्रांतील डॉक्टरांचा समावेश होता. सूरकल्प फाउंडेशनच्या या संवेदनशील आणि नाविन्यपूर्ण उपक्रमाचे वैद्यकीय क्षेत्रातून आणि सर्वच स्तरातून भरभरून कौतुक होत आहे.

# स्नेहबंधच्या कार्यक्रमात डॉ. निकिता पाठक यांचे फिजिओथेरपी वर मार्गदर्शन

मैत्रिणींनो मे महिन्याच्या सुट्टीनंतर आपल्या स्नेहबंध चा जून महिन्याचा कार्यक्रम दि.२७ जून २०२६ श्री परशुराम भवन मधील डॉ.लेले सभागृहात औत्सुक्यपूर्ण वातावरणात ५.४५च्या दरम्यान सुरू झाला. या कार्यक्रमासाठी आपण फिजिओथेरपिस्ट डॉ.निकीता पाठक यांना आमंत्रित केले होते. सुवर्णा सहस्त्रबुद्धे हिने प्रास्ताविक करुन, पाहुण्यांची ओळख करून दिली. मंगल जोगळेकर यांच्या हस्ते छोटीशी भेट देऊन कार्यक्रमाला सुरुवात झाली.

काही ठराविक वयानंतर शारिरीक हालचाली हळूहळू व्हायला लागतात आणि मग त्याचे परिणाम आपल्याला सहन करावे लागतात. वाढत्या वयात शारिरीक हालचाली किती, केव्हा आणि कोणत्या योग्य पद्धतीने कराव्यात? तसेच प्रत्येकाची कार्यक्षमता आणि आरोग्य टिकवून शरीराची कुवत बघून कशा पद्धतीने हालचाल करायची, याविषयी उपस्थित असलेल्या मैत्रिणींनी ह्या कार्यक्रमात जाणून, समजून आनंद घेतला. स्त्रियांच्या वेगवेगळ्या टप्प्यावरच्या आरोग्याविषयी चर्चा/संवादातून डॉ.निकिता यांनी मार्गदर्शन केल.

कार्यक्रमाचा विषयच असा होता की, आपण भगिनी, सहजासहजी ह्या विषयावर व्यक्त होत नाही. पण असा विषय ओघवत्या शैलीतून त्यांनी आपल्यापुढे मांडला. सोबत प्रत्येकवेळी मधे-मधे अनुषंगिक व्यायाम प्रकार करवून घेतले. त्यामुळे विषय समजणे, वेगवेगळ्या स्लाईडस् मधून विषयाचे आकलन सोपे झाले. गीता मराठे हिने उपस्थितांचे आभार मानले आणि कॉफीपानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

## स्नेहबंध चा जुलैमधील कार्यक्रम - 'आषाढी एकादशी -दिंडी'

**आषाढी एकादशीचे औचित्य साधून आपण दिंडी काढणार आहोत. त्यावेळी दिंडीला साजेल अशी वेशभूषा मैत्रिणींनी करुन यायचे आहे. दिंडीचे स्वरुप कसे असेल ते स्नेहबंध ग्रुपवर दिले जाईलच. तेव्हा मोठ्या संख्येत उपस्थित राहून दिंडीचा आनंद लुटूया.....**

**ठिकाण :- श्री.परशुराम भवन. डॉ.लेले सभागृह.**

**दिनांक :- शनिवार, दि. २५ जुलै २०२६ वेळ :- संध्याकाळी ५.३० वा.**

---

### चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

## देणगीदार - मे २०२६

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्री. प्रमोद महादेव दाभोळकर | २१,०००/- |
| ०२ | श्री. अभिजीत मधुकर जोशी (कै.मधुकर बाळकृष्ण जोशी यांचे स्मरणार्थ) | ५,००१/- |
| ०३ | श्री. पुरुषोत्तम सुरेश खरे | २,००१/- |
| ०४ | श्री. शेखर कृष्णाजी परांजपे | ५०१/- |



## भावपूर्ण श्रद्धांजली...

- आपल्या संस्थेचे आजीव सभासद व यशस्वी बांधकाम व्यावसायिक नंदकिशोर अवधूत आघारकर यांचे वयाच्या ७० व्या वर्षी दि. २५/६/२०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. अतिशय गरीब परिस्थितीत संघर्ष करुन त्यांनी बांधकाम व्यवसायात उत्तम यश व नावलौकिक प्राप्त केला होता. संस्थेच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

# नाशिकचा रविवार कारंजा - एक अखंड प्रवाही चैतन्यदायी उर्जास्त्रोत (लेखांक-२)




नाशिकचे नाव जेव्हा गुलछनाबाद/गुलशनाबाद होते तेव्हा आताच्या रविवार कारंजा, रविवार पेठ या सर्व परिसराला मातब्बरपुरा या नावाने ओळखले जाई. बहुतेक या भागात मातब्बर लोक रहात असावेत म्हणून हा मातब्बरपुरा.

पेठे विद्यालयाच्या जागी पुर्वी नाशिकचे कोर्ट होते. नंतरही पेठे विद्यालयास 'नवा पेशवे वाडा' या नावाने ओळखले जाई व आम्ही शाळेत असताना, म्हणजे मार्च १९६५ पर्यंत शाळेच्या इमारतीवर वरच्या भागात 'नवा पेशवे वाडा' असे ठळक अक्षरात लिहीलेले होते. कदाचित आजही असेल.

पेठे विद्यालयाच्या तेव्हाच्या पेशवाई गणेश दरवाजाकडून रविवार कारंजाला जोडणाऱ्या गल्लीच्या टोकाला आमच्या घरासमोर नाशिकचा सब जेल (तुरुंग) साधारण १९६०-६१ साला पर्यंत होता. त्या तुरुंगासमोर एक मोठा ओटा होता ज्याच्यावर पाच सहा पायऱ्या चढून जावे लागे. जेलच्या मोठ्या भक्कम दरवाजाला एक छोटा दिंडी दरवाजा होता व बहुधाः त्याचाच वापर केला जाई. बरेचदा दोन शिपाई एखाद्या गुन्हेगाराच्या दोन्ही दंडास दोर बांधून त्या दिंडी दरवाजाच्या आत जाताना मी अनेकदा पाहिले आहे.

जेल बाहेरच्या त्या मोठया ओट्यावर साधारण १९५९ च्या सुमारास जेलचेच एक टपरीवजा मोठे दुकान उघडले गेले. या दुकानात जेलमधील कैद्यांनी तयार केलेल्या वस्तू जशा मजबूत सतरंज्या, जाजमे, केनचे तसेच लाकडी फर्निचर व जाळीचे बॉल (कापडी दोऱ्याने घट्ट विणलेले) वगैरे तुलनेने माफक दरात विक्रीसाठी ठेवलेले असत.

त्या काळी नाशकातील बहुतेक मुलांचे गल्ली क्रिकेट हे जाळीच्या बॉलवरच चाले. जेलचे बॉल हे गावात तीन चार ठिकाणी मिळणाऱ्या जाळीच्या बॉलपेक्षा घट्ट विणलेले व त्यामुळे अधिक कडक असत. बहुधा राकट, रागिष्ट व क्रूर असलेल्या कैद्यांकडुन ते जबरदस्तीने विणून घेतलेले असल्याने ते मजबूत होत असावेत असा आम्हा मुलांचा त्या वेळी समज असे. हे बॉल तेव्हा चार आण्यास एक (म्हणजे तेव्हाचे नवे २५ पैसे) या दराने विकले जात. या दुकाना शेजारी जेलचीच एक खोली होती. जेल पाडल्या नंतर सुद्धा ही खोली तशीच शाबुत होती व तिच्यात 'येवलेकर बाबा' या नावाने ओळखला जाणारा परिसरातील एक बेवारस वृद्ध हमाल त्याच्या दीर्घ आजारपणा पश्चात झालेल्या अंतापर्यंत वास्तव्यास होता.

त्या काळी कधी कधी चांडक यांच्या 'कोंबडा छाप बीडी' चा एक बंद ट्रक, ज्याच्या दर्शनी भागात टपावर एका काचेच्या पेटीत जिवंत रुबाबदार कोंबडा ठेवलेला असे, हा रविवार कारंजावर येऊन थांबे. टपावर एक आकर्षक वेषभूषा केलेला हॅटधारी माणूस लाऊड स्पिकरवर तालासुरात गाणे म्हणे... नाशिकपासून गाव सिन्नर आमचं माहेरं! आम्ही तिथलं राहणारं!...मला म्हणतात कोंबडा छाप सिन्नर बिडी रं... असं म्हंटल्या बरोबर तो त्याच्या दोन्ही बाजुला बिड्यांनी भरलेल्या पोत्यातून मुठी भरभरून भरपूर बीडी बंडले दोन्ही बाजूस उधळे. कारंजावरील कष्टकरी जनता व पोरेटोरे यांची ती बीडी बंडले गोळा करण्यासाठी चढाओढ लागे. आम्ही गल्लीतील पोरे-टोरेही जास्तीत जास्त बीडी बंडले हस्तगत करून 'घ्या येवलेकर बाबा!' असे म्हणून येवलेकर बाबाकडे ती गोळा केलेली ढीगभर बीडी बंडले सुपूर्द करीत असू व आपण फार पुण्याचे काम करीत असल्याचे आगळे वेगळे समाधान प्राप्त करीत असू. मात्र थोडयाच वर्षात अति धुम्रपानाने झालेल्या फुफ्फुसाच्या विकाराने येवलेकर बाबा निवर्तला तेव्हा मात्र आम्हाला मनोमन अपराधित्वाची भावना दाटून येऊन वाईट वाटले.

जेलच्या आतमध्ये प्रवेश केल्यावर डाव्या बाजूच्या समोरील कोपऱ्यात एका मोठया कोनाड्यात हिरव्या कपड्याने काहीतरी झाकलेले असल्याचे दिंडी दरवाजातून दिसे. त्याला पीरबाबा म्हणत. त्यासमोर असलेल्या मोठया पॅसेजमधून आतमध्ये गेल्यावर चारी बाजुस बैठ्या बॅरक्स व मध्ये मध्यम आकाराचे मातीचेच मोकळे मैदान होते. जे जेल पाडल्यावर आमचे रोजचे क्रिकेट खेळण्याचे मैदान झाले. त्या बाबत आता पुढील भागात ...

**लेखक - प्रमोद प्र. रानडे**

उद्योजक मंचाची
जून महिन्यातील
सभा उत्साहात संपन्न






प्रसिद्ध गायक पंडित आशिष रानडे यांचा
सुरकल्प फाऊंडेशनच्या वतीने
डॉक्टर्स डे निमित्त आगळावेगळा उपक्रम




श्री परशुराम भवनास सेवा निवृत्त
एअर चीफ मार्शल श्री. भूषण गोखले
यांची सदिच्छा भेट







श्री.अनिल जोगळेकर यांचे
१००१ श्री गणेश चित्र प्रदर्शन

## चित्तपावन ब्राह्मण संघ : वधू यादी

| नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कुमारी आदिती अमोल लेले**<br>फ्लॅट नं.३, कुसुमराज अपार्टमेंट, हनुमानवाडी, नाशिक. मो. ९४०३७०८८८६ | १८/०३/१९९९ | कश्यप | ५'.५'' | बी.आर्कि. | ६६,०००/- |
| **कुमारी वैष्णवी विजय रहाळकर**<br>फ्लॅट नं.९, सप्तश्रृंगी अपार्टमेंट, चेतनानगर, नाशिक. मो. ७३८७७५३९५४ | २६/१२/१९९८ | भारद्वाज | ५'.४'' | एम.कॉम. | २२,०००/- |
| **कुमारी श्वेता श्रीकृष्ण देशपांडे**<br>बी ८०१, बोडके प्लाझा, वंडर फ्युचुरा नजीक, कोथरुड, पुणे | ०९/१०/१९९८ | अत्रि | ५'.४'' | एम.फार्मा. | ४०,०००/- |

## चित्तपावन ब्राह्मण संघ : वर यादी

| नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कुमार क्षितीज समिर बोडस**<br>हिरापूर रोड, श्री चैतन्य हॉस्पीटल समोर, चाळीसगांव. मोबा.: | १३/०४/२००१ | वशिष्ठ | ६'.०'' | एम.कॉम | ४ लाख वार्षिक |
| **कुमार सौजन्य दत्तात्रय लोंढे**<br>पी. १००३, सन ॲटमोस्फिअर क्लब, ओ ७ रोड, शेला अहमदाबाद, ऋतुप्रभा, जयाबाई कॉलनी, नाशिकरोड. मोबा.: ९४२३६८३७२४ | ०२/१२/१९९५ | गार्ग्य | ५'.६'' | बी.एस्सी. | ५०,०००/- |

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, स्टेट बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :-**

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.